# अंतरिम अर्थसंकल्प 2019-20

**A) प्रशासन (Governance) –**

1) या सरकारने सर्वाधिक निर्णयक्षम, स्थिर आणि स्वच्छ सरकार दिले असून मोठ्या संरचनात्मक सुधारणांना सुरवात केली आहे.
2) भारत पुन्हा विकास आणि समृद्धीच्या मार्गावर आला आहे.
3) स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण होणाऱ्या 2022 या वर्षात 'नवीन भारत – New India' साकार करण्यासाठी सर्व प्रयत्नशील आहेत. हा नवीन भारत स्वच्छ आणि निरोगी असेल, प्रत्येकाला घर मिळालेले असेल, या घराला शौचालय–पाणी–विजेच्या सुविधा असतील, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले असेल, तरूण आणि महिलांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी पुरेशा संधी उपलब्ध असतील. हा नवीन भारत दहशतवाद, सांप्रदायिकता, जातीयवाद, भ्रष्टाचार, वशीलेबाजी इत्यादींतून मुक्त असेल.

**B) अर्थव्यवस्था व विकास (Economy & Development) –**

1) गेल्या 5 वर्षात जागतिक अर्थव्यवस्थेसाठी भारत हा आकर्षण बिंदू (bright spot) ठरला आहे.
2) भारतीय अर्थव्यवस्था ही 2013–14 मध्ये 11 वी मोठी अर्थव्यवस्था होती, ती आज 6 वी मोठी अर्थव्यवस्था बनली आहे.
3) चलनवाढ हा गरीब व मध्यमवर्गीयांवरचा छुपा आणि गैरवाजवी करच असतो. 2009 ते 2014 या काळातील चलनवाढीचा सरासरी दर 10.1% होता. नवीन सरकारने हा सरासरी दर 4.6% पर्यंत खेचण्यात यश मिळवले. डिसेंबर 2018 मध्ये चलनवाढीचा दर केवळ 2.19% होता.
4) 7 वर्षांपूर्वी राजकोषीय तूट (Fiscal deficit) 6% होती. ही तूट 2018–19 (RE) मध्ये 3.4% पर्यंत आणली गेली.
5) 6 वर्षांपूर्वी परकीय व्यापारातील चालू खात्यावरील तूट (CAD - Current Account Deficit) 5.6% होती. ही तूट 2018–19 मध्ये 2.5% होण्याची शक्यता आहे.
6) गेल्या 5 वर्षात 239 बिलियन डॉलरची परकीय थेट गुंतवणूक (FDI) आकर्षित करण्यात सरकारची धोरणे यशस्वी झाली आहेत.

**C) भारतीय वित्तीय बाजार (Indian Financial Market) –**

1) 2008 ते 2014 याकाळात सार्वजनिक बँकांनी दिलेली कर्जे 18 लाख कोटी रुपयांवरून 52 लाख कोटी रुपये झाली. 2014 मध्ये या बँकांची 5.4 लाख कोटी रुपयांची कर्जे अकार्यकारी (NPA) होती.
2) यावर उपाय म्हणून 4R - Recognition (ओळख), Recapitalization (पुनर्भांडवलीकरण), Resolution (निग्रह) आणि Reforms (सुधारणा) दृष्टीकोन अवलंबण्यात आला आहेच.
3) सार्वजनिक क्षेत्र बँकांचे 2.6 लाख कोटी रुपयांचे पुनर्भांडवलीकरण करण्यात आले आहे.
4) अर्थव्यवस्थेत प्रसार व्हावा, अधिक भांडवल उपलब्ध व्हावे आणि अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा लाभ घेता यावा या उद्देशाने सार्वजनिक बँकांचे विलीनीकरण करण्यात येत आहे.
5) स्वच्छ आणि पारदर्शक बँकिंगवर भर देवून त्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**D) सार्वजनिक वित्त – राजकोषीय व्यवस्थापन (Fiscal Management) –**

1) 2018–19 अर्थसंकल्पीय अंदाजानुसार 2018–19 मध्ये राजकोषीय तूट 3.3% राहणार होती. परंतू सुधारीत अंदाजानुसार (Revised Estimates) 2018–19 मध्ये राजकोषीय तूट 3.4% राहण्याचा अंदाज आहे. शेतकऱ्यांना PM-KISAN अन्वये 2018–19 च्या शेवटच्या तिमाहीत 2,000 रुपयांचा थेट उत्पन्न लाभ देण्यासाठी 20,000 कोटी रु. वाढीव खर्च उद्भवल्यामुळे 2018–19 ची तूट 3.3% ऐवजी 3.4% राहणार आहे.
2) 2019–20 मध्ये देखील राजकोषीय तूट 3.4% राहण्याचा अंदाज आहे.
3) 2018–19 पेक्षा 2019–20 मध्ये खर्चात 13.3% वाढ केली जाणार आहे.
4) FRBM समितीने निर्देशित केल्याप्रमाणे राजकोषीय तूटीच्या दृढीकरणाचा कार्यक्रम सुरु ठेवण्यात आला आहे. त्यामुळे 3% चे लक्ष्य गाठण्याचे प्रयत्न 2020–21 पर्यंत सुरू राहतीलच.
5) FRBM समितीने निर्देशित केल्याप्रमाणे कर्जाचे GDP शी असलेले प्रमाण 2024–25 पर्यंत 40% च्या खाली आणायचे आहे. यासाठी राजकोषीय तूटीच्या दृढीकरणासोबतच आता कर्ज दृढीकरणावर लक्ष केंद्रीत केले जाईल.

**E) करप्रस्ताव आणि करयंत्रणा (Tax Proposals & Tax System) –**

1) आयकर –

i) ज्यांचे वार्षिक उत्पन्न 5 लाख रुपयांच्या आत आहे त्यांना संपूर्ण कराचा परतावा (full tax rebate) मिळेल. याचा लाभ सुमारे 3

कोटी मध्यमवर्गीय करदात्यांना होण्याचा अंदाज आहे. हे मध्यमवर्गीय म्हणजे स्वयंरोजगारित, लघुव्यावसायिक, लघुउद्योजक, पगारदार, पेंशनर आणि ज्येष्ठ नागरिक होत.

ii) मागील अर्थसंकल्पात पगारदार व्यक्तींनी वाहतूक, आरोग्य अशा बाबींवर खर्च केलेले कमाल 40,000 रु. उत्पन्न आयकरमुक्त (standard deduction) करण्यात आले होते. आता ही पातळी कमाल 50,000 रु. करण्यात येणार.

iii) नागरिकांनी ठेवींवर कमावलेले 10,000 रुपयांच्या पुढील व्याज उत्पन्न TDS पात्र होते. आता 40,000 रुपयांच्या पुढील व्याज उत्पन्न TDS पात्र राहणार.

iv) नागरिकांनी भाडेकमाईतून कमावलेले 1,80,000 रुपयांच्या पुढील उत्पन्न TDS पात्र होते. आता 2,40,000 रुपयांच्या पुढील उत्पन्न TDS पात्र राहणार.

v) परवडण्याजोगे घर योजनेतून विकासकाला झालेल्या नफ्यावर आयकर कायद्यातील कलम 80–IBA अन्वये आयकरात 100% सूट मिळते. ही सूट 31 मार्च 2020 पर्यंत देणे चालू राहील.

vi) एक राहते घर विकून दुसरे राहते घर विकत घेतांना जर त्या आर्थिक वर्षात भांडवली लाभ झाला तर त्या लाभावर (कमाल 2 कोटी रु. लाभ) आयकर कायदा कलम 54 अन्वये भांडवली लाभ कर लागत नाही. आता विकत घेतलेली घरे 2 असतील तरी चालतील. हा लाभ आयुष्यात एकदाच घेता येईल.

vii) एका व्यक्तीची मालकीची एकापेक्षा जास्त घरे असतील तर 'एक घर वगळता' इतर घरांपासून (जरी ती भाड्याने दिलेली नसतील तरी) किमान उत्पन्न मिळते असे दाखवावे लागते. हे तत्व आता 'दोन घरे वगळता' असे करण्यात येणार.

viii) आयकर विवरणपत्र दाखल करणाऱ्या करदात्यांची संख्या 2013–14 मध्ये 3.79 कोटी होती. ती 2018–19 मध्ये 6.85 कोटी झाली. म्हणजे यात 80% ची वाढ झाली (किंवा 3.04 कोटीची भर पडली) आहे.

ix) प्रत्यक्ष कर महसूल 2013–14 मध्ये 6.3 लाख कोटी रुपये होता, तो 2018–19 (RE) मध्ये 12 लाख कोटी रुपये झाला आहे.

x) प्रत्यक्ष कर विभागाची सर्व कार्ये आता ऑनलाईन होतात. मागील वर्षातील 99.54% आयकर विवरणपत्रे जशी दाखल झाली तशी स्विकारली गेली. लवकरच प्रत्यक्ष कर विभागात मोठ्या तांत्रिक सुधारणा केल्या जातील. यामुळे विवरणपत्रांचा निपटारा 24 तासात होईल आणि कर परतावा असेल तर तो लागलीच दिला जाईल.

2) सीमाकर –

i) मेक इन इंडियाला चालना देण्यासाठी गेल्या 4 वर्षात 36 भांडवली वस्तूंवरील आयातशुल्क बाद करण्यात आले.

ii) आयात व निर्यात व्यवहारांच्या जलद निपटाऱ्यासाठी सीमाविभागाद्वारे नवीन डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे.

3) GST -

i) GST ही करप्रणालीतील सर्वात मोठी सुधारणा आहे.

ii) GST मुळे भारतीय बाजाराचे एकीकरण झाले आहे, कराधार (tax base) आणि करमहसूलात वाढ झाली आहे, सरकार आणि करदात्यांमधील रोजरोजचे क्लिष्ट व्यवहार कमी झाले आहेत.

iii) ऑनलाईन प्रणाली, e-way bill यामुळे आंतरराज्यीय व्यवहार शीघ्र व कार्यक्षम झाले आहेत. प्रवेश कर, जकात नाके, ट्रकांच्या रांगा दूर झाले आहेत.

iv) विविध वस्तूंवरील GST दरातील कपात, GST सवलत मर्यादेतील बदल, Composition Scheme मधील बदल, विवरणपत्र दाखल करण्याच्या अटींमधील शिथीलता अशा नवीन सुधारणा या वर्षात झाल्या आहेत.

## F) कृषी (Agriculture) –

1) शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सर्व 22 पिकांच्या किमान आधारभूत किंमती या उत्पादनमूल्याच्या दीडपट जाहीर होवू लागल्या आहेत.

2) शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये दोन अडचणी येत राहील्या.

i) अलीकडे अन्नधान्यांच्या किंमती आटोक्यात आल्याकारणाने शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळाला.

ii) दुसरी अडचण ही परंपरागत असून अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे जमीनच कमी असल्यामुळे कृषीपूरक योजना अशा शेतकऱ्यांसाठी अपुऱ्याच ठरतात.

वरील दोन्ही अडचणी बघता अल्पभूधारक शेतकऱ्यांना थेट उत्पन्न सहाय्य करणे हाच उपाय उरतो.

3) लघु व सीमांत शेतकऱ्यांना थेट उत्पन्न सहाय्य करण्यासाठी 'प्रधानमंत्री किसान संमान निधी' PM-KISAN (Pradhan Mantri Kisan Samman Nidhi) योजना सुरु केली जाणार. ज्या शेतकऱ्यांकडे 2 हेक्टर व त्यापेक्षा कमी लागवडयोग्य जमीन आहे असे लघु व सीमांत शेतकरी या योजनेचा लाभ घेवू शकतील. अशा असुरक्षित शेतकरी कुटुंबाला वार्षिक 6,000 रुपयांचे थेट उत्पन्न सहाय्य केले जाईल. देशात असे 12 कोटी कुटुंब आहेत. हे 6,000 रु. उत्पन्न त्या कुटुंबाच्या खात्यात प्रत्येकी 2,000 रुपयांप्रमाणे 3 हप्त्यात हस्तांतरीत केले जाईल. या खर्चाचा संपूर्ण भार केंद्रसरकार उचलणार. 2018–19 मधील 1 डिसेंबर 2018 ते 31 माचे

2019 असा एक 2,000 रुपयांचा हप्ता देखील दिला जाईल. यासाठी केंद्रसरकारला 20,000 कोटी रुपयांपर्यंत खर्च येईल. 2019-20 मध्ये या योजनेपोटी केंद्रसरकारला 75,000 कोटी रुपये खर्च येण्याचा अंदाज आहे.

4) PM-KISAN योजनेद्वारे लघु व सीमांत शेतकऱ्यांना किमान उत्पन्न मिळाल्यामुळे,
   i) शेतकऱ्यांना भरवशाचे सहाय्यभूत उत्पन्न मिळेल.
   ii) शेतकऱ्यांच्या हंमागपूर्व पतगरजा भागतील.
   iii) शेतकऱ्यांना (कर्जावरची अवलंबता कमी झाल्यामुळे ) आदरपूर्वक जीवन जगता येईल.
   iv) शेतकऱ्यांना बियाणे, खते, अवजारे, श्रम इत्यादी आदाने खरेदी करता येतील.
   v) कर्जबाजारीपणा आणि सावकारांकडून होणारी लूट यातून शेतकऱ्यांची सुटका होईल.
5) किसान क्रेडीट कार्ड योजनेचा अर्ज सरल व सुलभ केला जाईल.
6) मागील अर्थसंकल्पात किसान क्रेडीट कार्ड योजनेचा लाभ पशुपालन व मासेमारी करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील देवू केला होता. कृषी कर्जासाठी व्याज सवलत योजना (Interest Subvention Scheme) शेतकऱ्यांसाठी लागू आहे. या योजनेन्वये सरकारतर्फे 2% व्याजसवलत व वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 3% व्याजसवलत दिली जाते. चालू अर्थसंकल्पात या योजनेचा लाभ पशुपालन व मासेमारी करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील दिला जाणार आहे.
7) पशुपालनास प्रोत्साहन दिले जाईल. राष्ट्रीय गोकुळ मिशन साठीचा खर्च चालू वर्षात आधीच वाढवून 750 कोटी रु. करण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय वर्षात गाईंच्या जनुकीय स्त्रोतांमध्ये शाश्वत सुधारणा करून गाईंची उत्पादकता वाढवण्याच्या उद्देशाने 'राष्ट्रीय कामधेनू आयोग' स्थापन केला जाईल. हा आयोग गाईंच्या कल्याणार्थ असलेल्या योजना व कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत राहील.
8) मासेमारी उद्योगास प्रोत्साहन दिले जाईल. मासेमारी उत्पादनात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. जागतिक मासेमारी उत्पादनात भारताचा 6.3% वाटा आहे. भारतातील मासेमारी उत्पादनाचा अलीकडील वार्षिक वृद्धीदर 7% पेक्षा अधिक राहिलेला आहे. हे क्षेत्र 1.45 कोटी लोकांना प्राथमिक रोजगार पुरवते. या क्षेत्राच्या शाश्वत व लक्ष्यित विकासाच्या उद्देशाने स्वतंत्र 'मासेमारी विभाग' (Department of Fisheries) निर्माण केला जाईल.

**G) उद्योग (Industry) -**

1) 57 केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम (CPSE) शेअर बाजारात सूचीकृत करण्यात आले आहेत. त्यांचे बाजार भांडवल 13 लाख कोटी रुपयांचे आहे.
2) SIDBI आणि सार्वजनिक क्षेत्र बँका मिळून psbloanin59minutes ही योजना व पोर्टल विकसित केले आहे. या योजनेन्वये लघुउद्योगांना 1 कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज 59 मिनिटात मंजूर होते. GST नोंदणी असणाऱ्या लघुउद्योगांनी घेतलेल्या या कर्जावर 2% व्याजसवलत (interest rebate) देखील दिली जाते.
3) लघुउद्योगांना त्यांची उत्पादने विकण्यासांठी 2 वर्षांपूर्वी निर्माण केलेल्या Government e-Marketaplace (GEM) ला चांगला प्रतिसाद मिळत आहे. GEM चा लाभ आता मोठे उद्योग देखील घेवू शकणार आहेत.
4) देशी वस्तू व सेवा व्यापारावर विशेष लक्ष दिले जातेय.
5) DIPP (Department of Industrial Policy & Promotion) चे नाव DPIIT (Department for Promotion of Industries & Internal Trade) असे केले जाईल.
6) मेक इन इंडियामुळे मोबाईल व भाग बनवणाऱ्या उद्योगांची संख्या 2 वरून 268 झाली आहे.

**H) सेवाक्षेत्र (Service Sector) -**

1) मनोरंजन क्षेत्र हे मोठे रोजगारनिर्मितीक्षम आहे. सिनेमांचे शुटींग करण्यासाठी परकीय सिनेनिर्मात्यांना एकलखिडकी निपटारा देवून सुलभता (ease of shooting films) पुरवली जाते. आता हि सुलभता देशी सिनेनिर्मात्यांना देखील पुरवली जाईल.
2) Cinematograph कायद्यात कॅमेरा रेकॉर्डिंग द्वारे जी चोरी (piracy) होते, ती रोखण्यासाठीच्या तरतूदी टाकल्या जातील.
3) डिजिटल क्रांतीमुळे 3 लाख Common Service Centres मध्ये 12 लाख लोकांना रोजगार मिळाला आहे.

**I) पायाभूत सुविधा (Infrastructure) -**

1) रस्ते -
   i) भारत हा सर्वाधिक गतीने राष्ट्रीय महामार्ग उभारणारा देश ठरला आहे. रोज सुमारे 27 किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाची निर्मिती होत आहे.
   ii) दिल्ली भोवतालचा पूर्व द्रुतगती मार्ग (Eastern Peripheral Express Way), आसाम आणि अरूणाचल प्रदेशातील बोगीबील रेल्वेसह रस्ता पूल ही अडकून राहिलेली कामे पूर्ण झाली आहेत.

2) रेल्वे –

i) रेल्वेसाठी एकूण 1,58,658 कोटी रुपयांचे भांडवली साहाय्य करण्याचे प्रयोजन आहे. 2019–20 मध्ये रेल्वेला 64,587 कोटी रुपयांचे भांडवली सहाय्य केले जाईल.

ii) चालन गुणोत्तर (Operating Ratio) म्हणजे महसूलातील किती उत्पन्न तो उद्योग चालवण्यासाठी खर्च होते. 2017–18 मध्ये रेल्वेचे चालन गुणोत्तर 98.4% होते. 2018–19 (RE) मध्ये हे गुणोत्तर सुधारून 96.2% झाले असून 2019–20 (BE) मध्ये ते 95% होण्याचा अंदाज आहे.

iii) ब्रॉडगेज रेल्वेमार्गावरील सर्व मानवरहित क्रॉसिंग हटवण्यात आले आहेत.

iv) देशात विकसित आणि निर्मित अर्धजलदगती (semi high speed) अशी पहिली रेल्वे 'वंदे भारत एक्सप्रेस' लवकरच सुरु होईल. या एक्सप्रेसमुळे भारतीय प्रवेशांना गती, सेवा आणि सुरक्षेचा विश्वस्तरीय अनुभव येईल. देशी उत्पादनाला, मेक इन इंडियाला आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

3) जलवाहतूक –

i) कोलकाता ते वाराणसी दरम्यान जलमार्गावर पहिल्यांदा कंटेनर वाहतूकीची सुरुवात झाली आहे.

ii) ब्रम्हपुत्रा नदीची वाहतूकक्षमता सुधारून पुर्वोत्तर भागातून कंटेनर वाहतूकीची सुरुवात केली जाईल.

4) विमान वाहतूक –

i) उडान योजनेमुळे सामान्य नागरिक देखील विमानाने प्रवास करू लागला आहे.

ii) सिक्कीम मधले पेक्योंग विमानतळ कार्यरत झाल्यामुळे कार्यरत विमानतळांची संख्या 100 झाली आहे.

**J) खासगीकरण (Privatisation) –**

2017–18 मध्ये निर्गुंतवणूकीतून 1 लाख कोटी रु. उभारता आले. 2018–19 मध्ये 80,000 कोटी रुपयांच्या लक्ष्यापेक्षा जास्त निर्गुंतवणूक होण्याची शक्यता आहे.

**K) दारिद्रय निर्मुलन (Poverty Alleviation) –**

मगांनरेगा योजनेसाठी 60,000 कोटी रुपयांची तरतूद केली जाणार. गरज वाटल्यास वाढीव तरतूद देखील केली जाणार.

**L) कौशल्य विकास (Skill Development) –**

प्रधानमंत्री कौशल विकास योजनेमुळे 1 कोटी तरूण कौशल्य प्रशिक्षित होवून स्वावलंबी बनत आहेत. तरूणांसाठी National Program on Artificial Intelligence सुरू करण्यात आला आहे.

**M) आरोग्य (Health) –**

भारतात आतापर्यंत 21 AIIMS उभारले गेले आहेत किंवा उभारणी चालू आहे. यापैकी 14 AIIMS हे 2014 नंतर मंजूर झालेले आहेत. आता नवीन 22वे AIIMS हरयाणा मध्ये उभारले जाईल.

**N) अन्न (Food) –**

2013–14 मध्ये अन्न सबसीडी 92,000 कोटी रु. दिली गेली होती. हा आकडा 2018–19 मध्ये 1.7 लाख कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. 2019–20 मध्ये 1.84 लाख कोटी रुपयांची अन्नसबसीडी दिली जाणार.

**O) स्वच्छता (Sanitation) –**

स्वच्छ भारत मिशन मुळे ग्रामीण स्वच्छतेचे प्रमाण 98% झाले आहे. 5.45 लाख गावे हागणदारीमुक्त (Open Defecation Free) झाली आहेत.

**P) निवारा (Housing) –**

2014 ते 2018 या काळात प्रधानमंत्री आवास योजनेन्वये 1.53 कोटी घरे बांधली गेली.

**Q) इंधन, वीज, रस्ते (Fuel, Electricity, Roads) –**

1) मोफत LPG कनेक्शन देणाऱ्या उज्वला योजनेचे लक्ष्य 8 कोटी कनेक्शन देणे आहे. यापैकी 6 कोटी पेक्षा जास्त कनेक्शन दिले गेलेले आहेत.

2) सौभाग्य योजनेने प्रत्येक वीज नसलेल्या कुटुंबाला वीज पुरवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. (हे लक्ष्य 31 डिसेंबर 2018 ला गाठायचे होते.

परंतू ते गाठले गेले नाही). हे लक्ष्य आता मार्च 2019 पर्यंत गाठले जाईल.

3) सरकारने खासगी सहभागाने 143 कोटी LED बल्ब पुरवल्यामुळे गरीब व मध्यमवर्गीयांचे 50,000 कोटी रुपयांचे वार्षिक वीजबिल वाचले आहे.

4) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेन्वये 1.78 लाख गावांना पक्के व बारमाही रस्ते पुरवण्याचे लक्ष्य ठेवले होते. यापैकी 1.58 लाख गावांपर्यंत रस्ते पोहोचले आहेत. योजनेसाठी 2019-20 मध्ये 19,000 कोटी रुपयांची तरतूद केली जाणार.

**R) ग्रामीण विकास (Rural Development) -**

1) ग्रामीण जीवनाला बाधा न पोहचवता ग्रामीण क्षेत्राला शहरी सुविधा पुरवणे हे सरकारचे ध्येय राहिलेले आहे.

2) पुढील 5 वर्षात 1 लाख गावे 'डिजिटल गावे (Digital Villages)' करण्यात येणार.

**S) वित्तीय समावेशन (Financial Inclusion) -**

1) गेल्या 5 वर्षात 34 कोटी जनधन खाते उघडण्यात आले आहेत.

2) आधार योजनेची आता जवळजवळ वैश्विक अंमलबजावणी झालेली आहे.

**T) प्रादेशिक समावेशन (Regional Inclusion) -**

1) देशातील 115 मागास जिल्ह्यांमध्ये ASP योजना (Aspirational Districts Program) राबवला जात आहे. या योजनेमुळे या जिल्ह्यांमध्ये आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, जलस्त्रोत, वित्तीय समावेशन, कौशल्य विकास अशा विविध आयामांमध्ये लक्षणीय विकास झाला आहे.

2) पूर्वोत्तर राज्यांमध्ये पायाभूत सुविधा विकसित झाल्या आहेत. अरूणाचल प्रदेश हे प्रथमच हवाई नकाशावर आले आहे. मेघालय, त्रिपुरा व मिझोराम ही राज्ये प्रथमच रेल्वे नकाशावर आली आहेत. 2018-19 पेक्षा 2019-20 मध्ये पूर्वोत्तर राज्यांवरील खर्चात 21% वाढ करण्यात आली असून हा आकडा आता 58,166 कोटी रु. झाला आहे.

**U) महिला (Women) -**

1) उज्वला योजनेमुळे महिलांच्या जीवनमानात सुधारणा होत आहे.

2) प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या लाभार्थींपैकी महिला लाभार्थींचे प्रमाण 70% पेक्षा जास्त आहे.

3) प्रसूती रजा 12 आठवड्यांवरून 26 आठवडे करण्यात आली आहे.

4) प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेमुळे गरोदर मातांना आर्थिक साहाय्य होत आहे.

**V) मागासवर्ग (Backwards) -**

1) मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणावर परिणाम न होवू देता सरकारने गरिबांसाठी (आर्थिकदृष्ट्या मागासांसाठी) शैक्षणिक संस्था व शासकीय सेवांमध्ये 10% आरक्षण देवू केले आहे. यासाठी संस्थांमध्ये 25% जास्तीच्या जागा (अंदाजे 2 लाख) निर्माण करण्यात येतील.

2) अनुसूचित जातीसाठीच्या खर्चाची तरतूद 2018-19 मध्ये 56,619 कोटी रु. होती. ती 2019-20 मध्ये 76,801 कोटी रु. (35.6% वाढ) करण्यात येणार.

3) अनुसूचित जमातीसाठीच्या खर्चाची तरतूद 2018-19 मध्ये 39,135 कोटी रु. होती ती 2019-20 मध्ये 50,086 कोटी रु. (28% वाढ) करण्यात येणार.

4) विमुक्त, भटक्या आणि अर्धभटक्या जमातीची (De-notified, Nomadic and Semi-Nomadic Communities) ओळख व त्यांचे सूचीकरण करण्यात रेणके आयोग आणि इदाते आयोगाने प्रशंसनीय काम केलेले आहे. हे काम (ओळख व सूचीकरण) पूर्ण करण्यासाठी आता 'नीती आयोगांतर्गत एक समिती' स्थापन केली जाईल. या वर्गासाठी सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयांतर्गत एक 'कल्याण विकास मंडळ' (Welfare Development Board) निर्माण केले जाईल.

**W) सामाजिक सुरक्षा (Social Security) -**

1) 50 कोटी लोकांना आरोग्य उपचार पुरवणारी जगातली सर्वात मोठी 'आयुष्मान भारत योजना' सुरु झालेली आहे. आतापर्यंत 10 लाख रुग्णांनी योजनेचा लाभही घेतला आहे.

2) रस्तेविक्रेते, रिक्शा चालक, गवंडी, रोषेवीणकर, शेतमजूर, वीडीकामगार, हातमाग कामगार, चर्मकामगार आणि असे कितीतरी कामगार, जे असंघटित क्षेत्रात मोडतात, देशाच्या उत्पन्नात निम्मे योगदान देतात. देशातल्या कामगारांची संख्या सुमारे 42 कोटी आहे. या कामगारांना पेंशन सेवा पुरवण्यासाठी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन PM-SYM (Pradhan Mantri Shram-Yogi Maandhan)

योजना याच आर्थिक वर्षात (2018-19) सुरू करण्यात येणार.

3) PMSYM योजना –

i) ज्यांचे मासिक उत्पन्न 15,000 रुपयांच्या आत आहेत ते योजनेचा लाभ घेवू शकतील.

ii) सुरुवातीला 5 वर्षात 10 कोटी असंघटित कामगार हे लक्ष्य ठेवण्यात येईल.

iii) 18 ते 40 वर्ष वयापर्यंत या योजनेत सहभागी होता येईल. 18व्या वर्षी नोंदणी केल्यास मासिक 55 रु. योगदान द्यावे लागेल.

iv) सरकार वरील हप्त्याइतक्या रकमेचे स्वत: योगदान देईल. (म्हणजे 18व्या वर्षी नोंदणी करणाऱ्याचा हप्ता 110 रु. असेल. 55 रु. हप्ता तो स्वत: भरेल व 55 रु. त्याच्यावतीने सरकार भरेल.)

v) 60व्या वर्षानंतर कामगाराला 3,000 रु. मासिक पेंशन मिळेल.

4) 2019-20 साठी PM-SYM साठी 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**X) शाश्वत विकास (Sustainable Development) –**

1) पर्यावरण बदलाविरुद्धच्या प्रयत्नांचे भारत नेतृत्व करत आहे.

2) International Solar Alliance हा भारताच्या योगदानाने या क्षेत्रातला स्थापन झालेला पहिला आंतरराष्ट्रीय आंतरसरकारी करार आहे. या कराराचे मुख्यालय दिल्लीत निर्माण करण्यात आले आहे.

3) गेल्या 5 वर्षात भारताची सौर उर्जा स्थापन क्षमता 10 पटीने वाढली आहे. या क्षेत्राने लाखांच्या घरात रोजगार निर्मिती केली आहे.

**Y) संरक्षण (Defence) –**

1) 2019-20 मध्ये संरक्षणावरील खर्च 3 लाख कोटी रुपयांचा आकडा ओलांडणार आहे. आवश्यकता भासल्यास अधिक निधीची तरतूद केली जाईल.

2) One Rank One Pension (OROP) साठी गेल्या 4 वर्षात 35,000 कोटी रु. खर्च करण्यात आले आहेत.

3) Military Service Pay (MSP) मध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.

**Z) भ्रष्टाचार आणि विमुद्रीकरण (Corruption & Demonetistion) –**

1) RERA कायदा 2016 (Real Estate Regulation & Development Act), बेनामी व्यवहार प्रतिबंध कायदा 1988 (Benami Transaction Prohibition Act) आणि फरार आर्थिक अपराधी कायदा 2018 (Fugitive Economic Offenders Act) अशा विविध कायद्यांमुळे व त्यांच्या अंमलबजावणीमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आली आहे.

2) काळ्या पैशाविरुद्धचे कायदे आणि विमुद्रीकरणामुळे,

i) 1.3 लाख कोटी रुपयांचे उत्पन्न आयकराच्या जाळ्यात आले.

ii) 50,000 कोटी रुपयांची संपत्ती उघड झाली.

iii) 3.38 लाख खोट्या कंपन्या उघडकीस आल्या.

iv) 2017-18 मध्ये प्रत्यक्ष कर महसूलात 18% वाढ झाली.

v) 2017-18 मध्ये 1.06 कोटी लोकांनी आयकर विवरणपत्र भरले.

**पुढील दशकासाठी (Vision for the next Decade) –**

भारतीय अर्थव्यवस्था ही पुढील 5 वर्षात 5 ट्रिलियन डॉलर आणि पुढील 8 वर्षात 10 ट्रिलियन डॉलर बनवण्याचा कयास आहे. भारतीय संस्कृतीत जे काही शुभ आहे ते दाही दिशांमध्ये पसरणे अपेक्षित असते. 2030 मधला भारत खालील 10 आयामांमध्ये प्रगत झालेला असेल.

**1) भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधा (Physical & Social Infrastructure) –**

i) आधुनिक भौतिक सुविधा जसे रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळे, नागरी वाहतूक, गॅस, वीज, अंतर्गत जलवाहतूक विकास.

ii) सामाजिक सुविधा जसे प्रत्येकाला घर, आरोग्य, स्वच्छ वातावरण, उत्तम व विज्ञानकेंद्रीत शिक्षण पुरवणे.

**2) डिजिटल भारत (Digital Bharat) –**

i) डिजिटल संरचना उभारणे.

ii) डिजिटल अर्थव्यवस्था, अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रापर्यंत व प्रत्येक कोपऱ्यापर्यंत डिजिटल सेवा पुरवणे.

**3) हरीत धरणी आणि स्वच्छ आकाश (Green Mother Earth and Blue Skies) –**

i) इलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढवणे.

ii) वीज साठवण उपकरणांमध्ये विकास करणे.

iii) वरील उपायांद्वारे आयातीवरील अवलंबता कमी करणे व उर्जासुरक्षा प्राप्त करणे.

4) **ग्रामीण औद्योगिकरण (Rural Industrialisation) –**

i) ग्रामीण स्तरावरील कुटीरोद्योग, लघुउद्योग, स्टार्टअप उद्योगांचा विस्तार वाढवणे.

ii) यासाठी आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान ग्रामीण क्षेत्रापर्यंत पोहोचवणे.

iii) याद्वारे मेक इन इंडियाला चालना देणे व मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे.

5) **स्वच्छ नद्या, सुरक्षित पेयजल आणि सिंचनात पाण्याचा कार्यक्षम वापर (Clean Rivers, Safe Drinking Water & Efficient Use of Water in Irrigation) –**

i) नद्या व जलाशये जीवनाचे आधार आहेत. त्यामुळे गंगेसारख्या नद्या स्वच्छ करणे.

ii) सर्व भारतीयांना सुरक्षित पेयजल पुरवणे.

iii) सूक्ष्मसिंचनाची विविध तंत्रज्ञाने वापरून पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

6) **सागरी किनारा आणि सागरी जल (Coastline & Our Ocean Waters) –**

i) नील अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

ii) सागरमाला योजनेस गती देणे.

iii) अंतर्गत जलवाहतूकीचा जलद विकास करणे.

7) **अवकाश (Outer Skies) –**

i) भारताचा 'गगनयान' हा अवकाश कार्यक्रम जगातल्या उपग्रह क्षेपणासांठीचा क्षेपणतळ (launch pad) बनला आहे. या कार्यक्रमाचा विकास करत राहणे.

ii) 2022 पर्यंत भारतीय अंतराळवीर अवकाशात पाठवणे.

8) **अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता, अन्नधान्य निर्यात आणि जैविक शेती (Self-sufficiency in Food, Export & Organic Production) –**

i) आधुनिक शेती व मूल्यवर्धन करून उच्च उत्पादनक्षमता गाठणे.

ii) कृषी व अन्न प्रक्रिया, साठवण, शीतगृहे, पॅकेजिंग विकास करणे.

iii) अन्नधान्य निर्यात करून जगाची मागणी पूर्ण करणे.

iv) अधिकाधिक अन्नधान्य जैविक पद्धतीने उत्पादित करणे.

9) **निरोगी भारत (Healthy India) –**

i) चांगल्या आरोग्याचे आश्वासन देणे.

ii) आरोग्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा पुरवणे.

iii) 2030 पर्यंत परिश्रममुक्त आरोग्य सेवा आणि कार्यक्षम व व्यापक आरोग्य प्रणाली विकसित करणे.

iv) आरोग्यसेवांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना समान हक्क मिळवून देणे.

10) **न्युनतम सरकार महत्तम शासन (Minimum Government Maximum Governance) –**

i) निवडलेले सरकार आणि प्रशासन देशाचा कायापालट करू शकतात.

ii) 2030 पर्यंत भारतात कार्यक्षम, जबाबदार आणि जनतेला अनुकूल अशी नोकरशाही (bureaucracy) विकसित झालेली असेल.

दीपस्तंभ®
प्रकाशन
0257-2223218

